जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAY 2018
पुण्यनगरी

विद्यापीठ ऑनलाईन परीक्षा २२ पासून

कोल्हापूर / प्रतिनिधी :

शिवाजी विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षा २२ ते २९ मे दरम्यान होणार आहेत. एकूण एकोणतीस अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा येंदा ऑनलाईन पद्धतीने होणार आहेत.

या परीक्षामध्ये २२ मे रोजी एम. ए/एम. एस्सी भूगोल, एम. ए. मास कम्युनिकेशन, एमएस्सी. अल्कोहोल टेक्नॉलॉजी, बॅचलर ऑफ जर्नालिझम, मास्टर ऑफ जर्नालिझम, एमएस्सी. शुगर टेक्नॉलॉजी, एमएस्सी. ॲग्रो केमिकल अँड पेस्ट मॅनेजमेंट, एमएस्सी. जिऑलॉजी, बी. लिब अँड इन्फर्मेशन सायन्स, एम. लिब अँड इन्फर्मेशन सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स. २३ मे रोजी एमएस्सी. मायक्रोबायोलॉजी, एमएस्सी. फार्मास्युटिकल मायक्रोबॉयोलॉजी, इंडस्ट्रियल मायक्रोबॉयोलॉजी, एमएस्सी. झुलॉजी, एमएस्सी. बायोटेक्नॉलॉजी, एमएस्सी. बायोकेमिस्ट्री, एम.ए. एन्ट्रन्स फॉर ऑदर फॅकल्टी. २४ मे रोजी एमएस्सी. केमिस्ट्री , एम. एस्सी. मॅथेमॅटिक्स, एमएस्सी. फिजिक्स. २६ मे रोजी एमएस्सी. स्टॅटिस्टिक्स, एमएस्सी. ॲप्लाईड स्टॅटिस्टिक्स अँड इन्मेंटिक्सए, एमएस्सी. बॉटनी, एमएस्सी. कॉम्प्युटर सायन्स. २८ मे रोजी एमएस्सी. एन्व्हायर्न्मेंटल सायन्स, एमएस्सी. फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी, एमटेक, एमबीए डिस्टन्स मोड अँड एमबीए. २९ मे रोजी बीएस्सी, एमएस्सी. नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी या परीक्षा होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAY 2018
महाराष्ट्र टाईम्स

प्रा. भोसले यांना पीएचडी

वैशाली भोसले

कोल्हापूर : प्रा. वैशाली भोसले यांनी शिवाजी विद्यापीठाची पीएचडी मिळाली. त्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटमध्ये कार्यरत आहेत. त्यांनी 'डिझाइन अँड डेव्हलपमेंट ऑफ कम्पायलर मोडुल्स युजिंग फायनाइट फझी ऑटोमेटा ' विषयावर शोधनिबंध सादर केला. त्यांना जळगाव उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे गणित विभागप्रमुख डॉ. श्रीकांत चौधरी, डॉ. आर. के. कामत, डॉ. के. एस. ओझा यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAY 2018

लोकमत

शामकुमार चव्हाण यांना पीएच.डी.

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या

तंत्रज्ञान अधिविभागातील सहायक प्राध्यापक शामकुमार भीमराव चव्हाण यांना शिवाजी विद्यापीठाची इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंगमधील पीएच.डी. पदवी जाहीर झाली. त्यांनी 'फॉल्ट डायग्नोस्टिक्स टॉलरंट टेक्निक्स फॉर फुल ब्रिज डी. सी. कॉन्व्हर्टर्स अप्लाइड टु फोटोव्होल्टिक ॲप्लिकेशन्स' या विषयावरील प्रबंध विद्यापीठाला सादर केला. त्यांनी दोन पेटंट्सची नोंदणी केली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAY 2018
तरुण भारत

माजी सिनेट सदस्य बंडोपंत ठिकपुर्ले यांचे निधन

कोल्हापूर : ज्येष्ठ आंबेडकरवादी विचारवंत बंडोपंत धोंडिराम ठिकपुर्ले (वय ९४) यांचे निधन झाले. ते शिवाजी विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्य होते. जिल्हा परिषदेचे माजी सदस्य व महानगरपालिकेच्या शिक्षण समितीचे उपसभापती म्हणूनही त्यांनी काम पाहिले होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे, असा परिवार आहे.